राधा ही बावरी

अल्बम ः तु माझा किनारा

गायक ः स्वप्निल बांदोडकर

गीत, संगीत ः अशोक पत्की

रंगात रंग तो श्याम रंग पाहण्या नजर भिरभिरते
ऐकुन तान विसरून भान ही वाट कुणाची बघते
त्या सप्तसुरांच्या लाटेवरूनी साद ऐकुनी होई
राधा ही बावरी हरीची राधा ही बावरी
राधा ही बावरी हरीची राधा ही बावरी

हिरव्या हिरव्या झाडांची पिवळी पाने झुलताना
चिंबचिंब देहावरूनी श्रावणधारा झरताना
हा दरवळणारा गंध मातीचा मनास बिलगुन जाई
हा उनाड वारा गुज प्रीतीचे कानी सांगून जाई
त्या सप्तसुरांच्या लाटेवरूनी साद ऐकुनी होई
राधा ही बावरी हरीची राधा ही बावरी
राधा ही बावरी हरीची राधा ही बावरी

आज इथे या तरूतळी सुर वेणूचे खुणावती
तुज सामोरी जाताना उगा पाऊले घूटमळती
हे स्वप्न असे की सत्य म्हणावे राधा हरखून जाई
हा चंद्र चांदणे ढगा आडुनी प्रेम तयाचे पाही
त्या सप्तसुरांच्या लाटेवरूनी साद ऐकुनी होई
राधा ही बावरी हरीची राधा ही बावरी
राधा ही बावरी हरीची राधा ही बावरी